**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे
मु. पो. सांगरुळ, ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ
द्वारा श्रीराम हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, कुडित्रे
(कु.का. सहकारी साखर कारखाना साईट), कुडित्रे
ता. करवीर, जि. कोल्हापूर

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
हसूर हायस्कूल, हसूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल, बहिरेश्वर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल, पाडळी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल, कोगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४+२५+२६+३२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.१०.२००७ |

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| २४ / कोल्हापूर | दि. १९.१२.२००६ | दि. -- | दि. १४.४.२००६ | दि. -- |
| २५ / कोल्हापूर | दि. ७.२.२००६ | दि. ३.१०.२००७ | दि. १४.४.२००६ | दि. -- |
| २६ / कोल्हापूर | दि. १९.१२.२००५ | दि. -- | दि. १४.४.२००६ | दि. -- |
| ३२ / कोल्हापूर | दि. १९.१२.२००५ | दि. -- | दि. १४.४.२००६ | दि. -- |

अपील क्र. २४, २५, २६, ३२ / कोल्हापूर

मागणी केलेली माहिती

हायस्कूल मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीबाबत सन १९८४ ते सन २००४ पर्यंत संस्थेच्या कार्यकारी मंडळाने / समन्वय समितीने सादर केलेने प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेशाच्या प्रती. हायस्कूलला देण्यात आलेले वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमा व त्याचे आदेशाची प्रत

## विवेचन

अपीलकर्ता श्री. वसंत ऊर्फ प्रल्हाद नारायण खाडे यांनी सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ द्वारा श्रीराम हायस्कूल / ज्युनियर कॉलेज, कुडित्रे (कु.का. सहकारी साखर कारखाना साईट), ता. करवीर, जि. कोल्हापूर यांच्या ९ शाळा / महाविद्यालये यांची विविध स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून मागितली होती. शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीबाबत कार्यकारी मंडळाने / समन्वय समितीने सादर केलेले प्रस्ताव, त्यासोबतची कागदपत्रे व त्यावरील आदेश, वेतन व वेतनेतर अनुदानाच्या रकमेचा तपशील, शाळेतील सेवकांकडून इमारत निधी कपात केलेल्या पत्राच्या नकला, बांधकामाचा जमाखर्च इत्यादी विस्तृत माहिती श्री. खाडे यांनी मागितली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सांगरुळ शिक्षण संस्था, सांगरुळ यांच्याकडे, तसेच तत्कालीन व्यवस्थेनुसार अपिलीय प्राधिकारी तथा संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे अपील केले. त्यानंतरही माहिती न दिली गेल्यामुळे किंवा मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री. खाडे यांनी राज्य

माहिती आयोगाकडे अपिले दाखल केली होती. संबंधित संस्था व श्री. खाडे यांना त्यांची भूमिका स्पष्ट करणारे निवेदन सादर करण्यास कळवून आयोगाने दि. २२.१०.२००७ रोजी कोल्हापूर येथे सुनावणी निश्चित केली होती. संबंधित माहिती श्री. खाडे यांना देण्यात आली असल्याचे सांगरुळ शिक्षण संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला कळविले. तसेच आपल्याला हवी असलेली माहिती मिळाली असून आपली तक्रार राहिलेली नाही, म्हणून अपील निकाली काढावे, असे निवेदन श्री. खाडे यांनी आयोगाला सादर केले आहे.

वरील बाब लक्षात घेता श्री. खाडे यांची अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २६.१०.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भारत गंगाराम औताडे व
श्री. राजाराम गंगाराम औताडे
मु.पो.कडलास, ता. सांगोला,
जि. सोलापूर-४१३३०९ अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५ + २६+ २७ + ४८३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भारत गंगाराम औताडे,
मु.पो.कडलास, ता. सांगोला, जि. सोलापूर-४१३३०९

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. व्ही. व्ही. जगताप

**मुख्याध्यापक** श्री. एस. जे. आवताडे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| २५ / सोलापूर | दि. २७.२.२००६ | दि. -- | दि. १०.४.२००६ | दि. -- |
| २६ / सोलापूर | दि.२४.२.२००६ | दि. १६.३.२००६ | दि. २८.३.२००६ | दि. २४.२.२००६ |
| २७ / सोलापूर | दि. १०.४.२००६ | दि. ३०.५.२००६ | दि. -- | दि. -- |
| ४८३/ सोलापूर | दि. १८.१.२००६ | दि. ४.२.२००६ | दि. १५.२.२००६ | दि. १५.१.२००७ |

**अपील क्र. २५ / सोलापूर**

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

दि. २४.१.२००६ रोजी रजेवर असल्याचा खुलासा खात्याकडे दिला आहे तो तोंडी का लेखी, लेखी असल्यास त्याची छायांकित प्रत,

**विवेचन**

आपण दि. २४.१.२००६ रोजी रजा घेतल्याच्या संदर्भातील मंजुरीची प्रत, जानेवारी २००६ चे वेतन देयक सादर केले असल्यास त्याची तारीख व जावक क्रमांक इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री. भारत गंगाराम औताडे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हनुमान हायस्कूल, तांदुळवाडी यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. या अपिलाची सुनावणी होऊनही आदेश मिळाला नाही म्हणून श्री. औताडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. भारत गंगाराम औताडे हे तांदुळवाडी हायस्कूल या संस्थेत लेखनिक आहेत. रजेविषयी माहिती मागणाऱ्या त्यांच्या अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर पाठविले आहे. आपण कळविलेले शुल्क अर्जदाराने भरले नाही. त्याबाबत स्मरणपत्र देऊनही आजतागायत रक्कम भरली नसल्यामुळे इतर माहिती दिली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीत संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करुन निदर्शनास आणले. पोस्टाचा दाखला घेऊन आपल्याला पाठविण्यात आलेल्या पाकिटात कोरा कागद होता, केवळ नोंद करण्यासाठी पाकिट पाठवून दिशाभूल केली, असा दावा श्री. औताडे यांनी केला. जन माहिती अधिकाऱ्यांनी याचा इन्कार केला. परंतु संबंधित दिनांकाला पाठविलेल्या माहितीच्या प्रती आपण मागितल्या असता कोणतेही पत्र पाठविले नसल्याचा खुलासा जन माहिती अधिकाऱ्यांनी केला असल्याचे श्री. औताडे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. परस्परांवरील आरोप / प्रत्यारोप व त्या अनुषंगाने न्यायालयात व विविध अधिकाऱ्यांपर्यंत वेगवेगळ्या मंचांवरील तक्रारी असे सातत्याने उभय बाजूंनी केले जात असल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होत आहे. श्री. औताडे वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने माहिती मागवून जाणीवपूर्वक त्रास देत

असतात, शुल्क भरत नाहीत व माहिती न मिळाल्याची तक्रार करतात. संस्थेविरुध्द शिक्षण संचालकांकडे विविध स्वरुपाचे अर्ज करतात, अशा प्रकारे त्रास देतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हनुमान हायस्कूल तांदुळवाडी यांनी लेखी व तोंडी केले. आपल्याला हव्या असलेल्या माहितीसाठी आपण अर्ज करीत असून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने अर्ज केले नाहीत, मात्र आपले बंधू श्री. राजाराम गंगाराम औताडे यांच्या नावाने आपण अपील व अर्ज केले, असे श्री. भारत गंगाराम औताडे यांनी सांगितले.

आपापसातील वादातून उभय बाजूंमध्ये झालेल्या संघर्षाचा एक भाग असे श्री. भारत गंगाराम औताडे यांच्या रजेच्या व त्याला संस्थेकडून मिळणाऱ्या प्रतिसादाचे स्वरुप आहे. आयोगाने यापूर्वीही श्री. औताडे बंधू यांच्या अपिलांची व तक्रारींची दखल घेतलेली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत अपिलाची दखल न घेणे योग्य नाही, याची समज विद्यमान अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या मार्फत तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

अपीलकर्त्याला अपेक्षित असलेली व द्यावयाची राहिलेली माहिती नि:शुल्क द्यावी.

**अपील क्र. २६ / सोलापूर**

<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

हनुमान हायस्कूल, तांदुळवाडी, ता. माळशिरस या प्रशालेच्या सन २००२-०३, २००३-०४ व २००४-०५ सेवक संच निर्धारण प्रपत्रांच्या झेरॉक्स प्रती, श्री. राजेंद्र रंगनाथ बेसुळके (उपशिक्षक), यांच्या प्रथम नियुक्तीपासून पूर्ण वेळ नियुक्ती होण्यापर्यंतच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावांच्या व शासकीय आदेशांच्या प्रती

**विवेचन**

हनुमान हायस्कूल, तांदुळवाडी, ता. माळशिरस या प्रशालेच्या सन २००२ ते २००५ या काळातील सेवक संच निर्धारण प्रपत्रांच्या प्रती, श्री. राजेंद्र रंगनाथ बेसुळके (उपशिक्षक) यांच्या प्रथम नियुक्तीपासून पूर्ण वेळ नियुक्ती होण्यापर्यंतच्या वैयक्तिक मान्यता प्रस्तावांच्या व शासकीय आदेशांच्या प्रती इत्यादी माहिती श्री. भारत गंगाराम औताडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन श्री. औताडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यांनी दखल न घेतल्यामुळे श्री. औताडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. औताडे यांच्या अर्जातील सेवक संच निर्धारण प्रपत्र, अर्धवेळ शिक्षक पूर्ण वेळ होण्याची कारणे, श्री. बेसुळके यांचे वैयक्तिक मान्यता प्रस्ताव इत्यादी पाच मुद्यांची माहिती मुख्याध्यापक, हनुमान हायस्कूल यांच्याकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी श्री. औताडे यांना कळविले व अन्य तीन मुद्यांची

माहिती दिली. मुख्याध्यापकांकडून माहिती घेण्यास सांगण्याला श्री. औताडे यांनी आक्षेप घेतला, तो रास्त आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी हा अर्ज संबंधित मुख्याध्यापकांकडे पाठविणे आवश्यक होते. मात्र सर्व माहितीच्या स्थळप्रती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांनी माहिती देणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री. औताडे यांनी केले. अशा प्रकारे सर्व शाळांच्या सदंर्भातील माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून देणे कामकाजाच्या दृष्टीने सोईचे नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन. वीर यांनी विषद केले. संबंधित शाळेकडून / संस्थेकडून माहिती मिळत नसल्यास ती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून मागणे रास्त आहे. मात्र शाळेऐवजी सर्वच माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून अपेक्षित करणे योग्य नाही, हे श्री. वीर यांचे प्रतिपादन योग्य आहे. मात्र शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत देणे, तसेच अपिलाची सुनावणी विहित मुदतीत करणे आवश्यक आहे, याची समज संबंधितांना देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. प्रशालेकडील माहिती जन माहिती अधिकारी / मुख्याध्यापक यांनी व शिक्षणाधिकारी कार्यालयाकडील माहिती जन माहिती अधिकारी / उप शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

**अपील क्र. २७ / सोलापूर**

मूळ अर्जात केलेली मागणी

१. सन १९९६-२००० या वर्षी अर्धवेळ नेमणूक केलेल्या शिक्षकांची वैयक्तिक मान्यता प्रतीची छायांकित प्रत

२. माहे फेब्रुवारी २००५ व मार्च २००५ च्या पगार पत्रकाची दोही बाजूंची छायांकित प्रत

३. अर्धवेळ शिक्षक पूर्णवेळ कोणत्या कारणास्तव झाला याची सविस्तर माहिती

४. पूर्ण वेळ झाल्याबद्दल घेतलेली सदर शिक्षकाची वैयक्तिक मान्यता प्रत

५. पूर्ण वेळ नेमणूक झाल्यांतर त्याची शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती होण्याऐवजी नियमित वेतनश्रेणीत कोणत्या आधारे मान्यता दिली त्या शाळा समितीच्या ठरावाच्या प्रतीची प्रत

**विवेचन**

सन १९९९-२००० ते २००४-२००५ या काळातील अर्धवेळ शिक्षकांची वैयक्तिक मान्यतेची प्रत, तो पूर्णवेळ होण्याची कारणे इत्यादी माहिती श्री. राजाराम गंगाराम औताडे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हनुमान हायस्कूल, तांदुळवाडी, ता. माळशिरस यांच्याकडे मागितली होती. श्री. भारत गंगाराम औताडे यांच्या याच विषयावरील अपिलाची ही पुनरावृत्ती आहे. पाकिटात कोरे कागद पाठवून दिशाभूल करणे यासारखे आरोपही त्याच स्वरुपाचे आहेत. आपल्याला हव्या असलेल्या माहितीसाठी आपण अर्ज करीत असून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने अर्ज केले नाही,

मात्र आपले बंधू श्री. राजाराम गंगाराम औताडे यांच्या नावाने आपण अपील व अर्ज केले, असे श्री. भारत गंगाराम औताडे यांनी सांगितले.

शुल्क न भरता, तसेच अपिलाच्या सुनावणीला हजर न राहता माहिती न मिळाल्याचा आरोप श्री. औताडे करीत आहेत हेच प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांनी येथेही केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत पत्रव्यवहार केला आहे व १४/- रुपये शुल्क कळविले आहे. श्री. राजाराम गंगाराम औताडे यांनी ते भरले नाही. विहित मुदतीत शुल्क भरण्यास कळविल्यानंतर ते भरले पाहिजे, ते न भरता माहिती न मिळण्याची तक्रार करणे योग्य नाही व सर्व यंत्रणांचा वेळ वाया घालविणारे आहे. याची पुनरावृत्ती न करण्याची समज श्री. भारत व श्री. राजाराम गंगाराम औताडे यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले १४/- रुपये शुल्क भरुन अपीलकर्त्याने माहिती घ्यावी.

**अपील क्र. ४८३ / सोलापूर**

मूळ अर्जात केलेली मागणी

सन १९८४-८५ ते २००४-०५ अखेर पर्यंतच्या हनुमान घिकास मंडळ, तांदुळवाडी या संस्थेकडे अनामत रक्कम ठेवलेल्या व्यक्तींची रकमेसह यादी, संबंधित व्यक्तींशी विश्वस्तांचे नातेसंबंध असल्यास त्याचा तपशील, अनामत ठेवी स्वीकारण्यासाठी धर्मादाय आयुक्तांची परवानगी असल्यास त्याची प्रमाणित प्रत

**विवेचन**

सन १९८४-८५ ते २००४-०५ अखेर पर्यंत हनुमान विकास मंडळ तांदुळवाडी या संस्थेकडे अनामत रक्कम ठेवलेल्या व्यक्तींची रकमेसह यादी, संबंधित व्यक्ती, विश्वस्तांचे नातेसंबंध असल्यास त्याचा तपशील, अनामत ठेवी स्वीकारण्यासाठी धर्मादाय आयुक्तांची परवानगी असल्यास त्याची प्रमाणित प्रत इत्यादी माहिती श्री. राजाराम गंगाराम औताडे यांनी सचीव, हनुमान विकास मंडळ, तांदुळवाडी यांच्याकडे मागितली होती. आपल्या विश्वस्त संस्थेला राज्य अथवा केंद्र शासनाकडून कोणताही लाभ अथवा मदत प्राप्त होत नसल्यामुळे या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कायदा लागू होत नाही असे उत्तर सचिवानी दिले. तसेच 'आपण स्वत: व आपले बंधू श्री. भारत गंगाराम औताडे हे अप्रामाणिक हेतूने प्रेरित होऊन निरनिराळया मार्गांनी संत्रस्त करुन आमचे संस्थेवर दबाव आणू पहात आहात. त्याचाच एक भाग म्हणजे प्रस्तुतचा अर्ज आहे हे स्पष्ट होत आहे. सबब आपला अर्ज रद्दबातल ठरविण्यात आला आहे याची कृपया नोंद घ्यावी, असेही त्यांनी या उत्तरात म्हटले आहे.

याविरुध्द श्री. औताडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर

यांच्याकडे अपील केले. उपरोक्त संस्थेला माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू होत नसल्याचा सचिवांचा दावा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. अे.एम. अंबळकर यांनी फेटाळून लावला व योग्य ते शुल्क आकारुन श्री. औताडे यांना माहिती देण्याचा आदेश त्यांनी दिला. अपिलाची सुनावणी विहित मुदतीत न झाल्याच्या कारणावरुन श्री. औताडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

प्रथम अपिलाची सुनावणी विलंबाने (जवळ जवळ १० महिन्यांनी ) झाली आहे, हे अपीलकर्त्याचे म्हणणे रास्त आहे. प्रथम अपिलाची सुनावणी विहित मुदतीत करण्याची समज अपिलीय प्राधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.
२. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी निःशुल्क द्यावी व दि. ११.११.२००७ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

**पुणे**
**दि. २९.१०.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. शबाना अ. रजाक शेख
रा. ८३३:३१, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
नगर अभियंता, भूमी व मालमत्ता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. शबाना अ. रजाक शेख, रा. ८३३:३१, उत्तर कसबा, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. ए. एस. विपन

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, भूमी व मालमत्ता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. गंगाधर म. दुलंगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

शहर सोलापूर येथील उत्तर कसबा घर क्र. ८२३/३१ मधील बेघर झालेल्या व्यक्तींना देण्यात आलेल्या पर्यायी जागेसंबंधीची माहिती

## विवेचन

पावसामुळे शहर सोलापूर येथील उत्तर कसबा घर क्र. ८२३/३१ मधील बेघर झालेल्या व्यक्तींना देण्यात आलेल्या पर्यायी जागेसंबंधीची माहिती अपीलकर्त्या सौ. शबाना अ.रजाक शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (विशेष), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे सौ. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सौ. शेख यांचे पती श्री. अ.रजाक अ. सत्तार शेख यांनीही याच स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती.

सोलापूर महानगरपालिकेने, दिलेली पर्यायी जागा विकता येत नसतानाही धारणकर्त्यांनी परस्पर विकली, या संदर्भातील हा विषय आहे.

या संदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. श्री. अ.रजाक अ. सत्तार शेख यांना सोलापूर महानगरपालिकेकडील छायांकित प्रतींवरुन माहिती देण्यात आली होती. तसेच सौ. शबाना अ. रजाक शेख यांनी मूळ कागदपत्रे न्यायालयात दाखल केलेल्या दाव्याच्या संदर्भात न्यायालयात सादर करण्यात आली आहेत. या संदर्भातील सर्व वस्तुस्थिती सौ. शेख यांना समक्ष सांगितली होती व त्यांनी आपले समाधान झाल्याचे सांगितले होते, म्हणून लेखी उत्तर दिले नव्हते. मात्र त्यांनी नंतर

अपील केल्यामुळे पूर्ण माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री. गंगाधर म. दुलंगे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (विशेष), सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. ए.एस. विपन यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. सौ. शेख सुनावणीस उपस्थित नव्हत्या, परंतु आपल्याला सर्व कागदपत्रे व माहिती मिळाली असून आपले समाधान झालेले आहे व कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन सौ. शेख यांनी आयोगाला पाठविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपीलकर्त्याला संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे व तक्रार राहिलेली नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे.

**पुणे**
**दि. २५.१०.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार मनोहर पानसरे,
७९०, वेताळपेठ, ता. भोर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण
श्री. विश्वास नांगरे-पाटील — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे
श्री. एस. बी. पाटील

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.६.२००६ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नंदकुमार मनोहर पानसरे, ७९०, वेताळपेठ, ता. भोर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण
श्री. विश्वास नांगरे-पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना दि. २३.१.२००६ रोजी दिलेल्या अर्जावर पोलिस खात्याने संबंधित अधिकारी पोलिस अधीक्षक यांनी केलेल्या कामकाज व कर्तव्याची संपूर्ण माहिती, तसेच कोणत्या अधिकाऱ्याने व कर्मचाऱ्याने कामकाज केले त्याचा संपूर्ण अहवाल, काजकाजाची व कार्यपध्दतीची माहिती.

## विवेचन

पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्याकडे दि.२३.१.२००६ रोजी केलेल्या अर्जावर कोणत्या अधिकाऱ्याने कोणती कार्यवाही केली, कामकाजाची कार्यपध्दती काय, अशा स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.नंदकुमार पानसरे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपअधिक्षक, पुणे ग्रामीण यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते फेटाळल्यामुळे श्री.पानसरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. पानसरे यांच्याविरुध्द भोर पोलिसांनी दि.२८.१०.१९८३ रोजी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या संदर्भातील हा विषय आहे. या संदर्भात यापूर्वी श्री.पानसरे यांनी पालिस अधीक्षकांकडे अनेक अर्ज, निवेदने केले असून न्यायालयातही दावे झालेले आहेत. १९८३ व १९८६ मध्ये न्यायालयीन निकाल होऊन निर्दोष सुटका झाल्यानंतर त्या विषयाशी संबंधित पोलिसांविरुध्द आता कारवाई करावी, अशी श्री.पानसरे यांची मुख्य मागणी आहे. महाराष्ट्राचे लोकआयुक्त, तसेच मुख्य राज्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश वि.जोशी यांच्याकडेही श्री.पानसरे यांनी यापूर्वी या संदर्भात अपील केले होते, ते फेटाळण्यात आले आहे. अधिकाऱ्यांपासून संबंधित मंत्र्यांपर्यंत अनेक पातळीवर श्री.पानसरे आपल्या विषया-संदर्भात निवेदने, अर्ज पाठवीत आले असून त्या त्या वेळी त्यांना योग्य ते उत्तर देण्यात

आलेले आहे असे अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री.विश्वास नांगरे-पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट केले. आपल्यावर विनाकारण कारवाई केली गेली असल्यामुळे संबंधित पोलिस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.पानसरे यांनी केली. परंतु हा विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. योग्य त्या सक्षम न्यायालयात त्याबाबत त्यांनी दाद मागावी असे यापूर्वीही विविध पातळयांवर त्यांना स्पष्ट करण्यात आलेले आहे.

वरील संदर्भ लक्षात घेता आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २९.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १
दिनांक ०६.१०.२००७

श्री. शिवाजी हणमंत सुगरे
सलगरवस्ती, डोणगांव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७/ ३८/४१ /४५/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी हणमंत सुगरे, सलगरवस्ती, डोणगांव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. पी.एस. मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. टी. एच. घाडगे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३७ / पुणे | ०३.०१.२००६ | १६.०२.२००६ | १६.०३२००७ | २५.०५.२००६ |
| ३८ / पुणे | ०४.०७.२००५ | १४.०७.२००५ | २९.०७.२००५ | १७.०९.२००५ |
| ४१ / पुणे | १७.०३.२००६ | ०१.०४.२००६ | ०५.०५.२००६ | १७.०६.२००६ |
| ४५ / पुणे | १३.०१.२००६ | २१.०१.२००६ | ०६.०२.२००६ | १५.०५.२००६ |

## अपील क्रमांक /३७/सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) उर्दू मदत शाळा, खानापूर या शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक यांच्या बेकायदेशीर रोखलेल्या वेतनाबाबतचा तपशील.

(२) मेहर उर्दू शाळा शिक्षण खात्यानेच बंद पाडल्याचा संस्थेने केलेला तक्रारी -अर्ज व दैनिक वर्तमानपत्रातही याबाबत आलेल्या बातमीबाबत माहिती.

(३) शिक्षण खात्याने मेहर उर्दू शाळेची मान्यता आपल्या अधिकारात रद्द केले बाबत संघर्ष समितीने केलेल्या पत्रव्यवहाराच्या नकला

(४) बाल विकास मंदिर, सलगरवाडी, सोलापूर या शाळेच्या ऑगस्ट पेड इन सप्टेंबर-२००३ ते एप्रिल पेड इन २००५ पर्यंतच्या शिक्षक वेतन बिलाच्या नकला व कालावधीतील सप्लीमेंटरी बिलाच्या नकला.

## विवेचन

उर्दू मदत शाळा, खानापूर, ता. अक्कलकोट येथील प्रभारी मुख्याध्यापकांचे वेतन रोखणे, मेहर उर्दू शाळा शिक्षण खात्याने बंद करणे व बाल विकास मंदिर, सलगरवाडी, सोलापूर या शाळेतील शिक्षकांचे वेतन या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. उर्दू मदत शाळेतील प्रभारी मुख्याध्यापकाचे वेतन व बाल विकास मंदिर शाळेतील शिक्षकांचे वेतन याबाबतची माहिती उपशिक्षणधिकारी, प्राथमिक वेतन पथक, सोलापूर यांच्या कार्यालयाशी निगडीत असलेल्या जन माहिती अधिका-यांनी या दोन मुद्दयांसाठी श्री.सुगरे यांचा अर्ज त्या कार्यालयाकडे पाठवून तसे श्री.सुगरे यांना कळविले. उर्वरीत माहितीसाठी ५२/- रुपये शुल्क

भरण्याबद्दल विहित मुदतीत त्यांनी श्री.सुगरे यांना कळविले. शुल्क भरल्यानंतर संबंधित माहिती श्री.सुगरे यांना देण्यात आली. मात्र आधी प्राथमिक वेतन पथक कार्यालयाने त्यांच्याकडील मुद्दयांची माहिती 'केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम (८)(१)(जे) अन्वये माहिती देता येणार नाही ' (सार्वजनिक हिताशी निगडीत नसलेली वैयक्तिक माहिती), व 'दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असलेने त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती घ्यावी', असे श्री.सुगरे यांना कळविले होते. या विरुध्द श्री.सुगरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरविला व 'अपीलकर्त्यांनी शाळेच्या संदर्भातील माहिती शाळेकडून घेऊन कार्यालयाचा वेळ वाचविण्यात यावा असे सांगितले', असे निर्णयपत्रात नमूद केले आहे. त्या विरुध्द श्री.सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तसेच संबंधितांकडे (वेतन पडताळणी पथक) अर्ज पाठविला आहे, त्याचप्रमाणे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनाही पाठवावयास हवा होता. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ८(१ जे) या तरतुदीचा जन माहिती अधिकाऱ्यांनी लावलेला अर्थ व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तो ग्राह्य मानणे चुकीचे आहे. सार्वजनिक हितासाठी संबंधित शाळेमधील कारभाराबाबत नागरिकांनी विचारलेली माहिती ङ तसेच सबळ कारण असल्याशिवाय - वैयक्तिक असल्याच्या कारणावरुन नाकारता येणार नाही. अर्ज इतर कोणाकडे पाठविता कामा नये, ज्यांच्याकडे माहिती मागितली त्यांनीच ती दिली पाहिजे, हा श्री.सुगरे यांचा आग्रह रास्त नाही.

## आदेश

(१) अपील अमान्य.
(२) उर्वरीत माहितीसाठी अपीलकर्त्यास संबंधित नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व अपीलकर्त्यास आवश्यक वाटल्यास त्यातील माहितीच्या प्रती निर्धारित शुल्क आकारुन द्याव्यात.

## अपील क्र. ३८/सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) जा.क्र. ३१४/२००० दि. २२.९.२००० च्या पत्रान्वये मागणी केलेल्या माहिती बाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती, व ती न केल्यास त्याचा सविस्तर खुलासा

(२) जा.क्र. ११/०३ दि.१०.११.२००३ चे संस्थेने दिलेल्या पत्रावर शिक्षण खात्याने केलेल्या कार्यवाहीची माहिती व कागदपत्रांच्या नकला.

(३) जा.क्र. ४७/२००४ व ४८/०४, दि. १९.८.२००४ या दोन्ही पत्रांवर शिक्षण खात्याने केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती व कागदपत्रांच्या नकला.

### विवेचन

बाल विकास मंदिर, सलगरवाडी, सोलापूर या शाळेकडील चार पत्रांच्या अनुषंगाने शिक्षण खात्याने केलेल्या कार्यवाहीची माहिती व संबंधित कागदपत्रांच्या नकला श्री.सुगरे यांनी मागितल्या होत्या. दि.२२.९.२००० रोजीच्या पत्रान्वये मागितलेल्या माहितीबाबत कार्यवाही केली नसल्यास त्याविषयी सविस्तर खुलासा द्यावा असेही त्यांनी माहिती-मागणीच्या अर्जात मुद्दा क.१ मध्ये नमूद केले आहे. या अर्जाबरोबरच दि.४.७.२००५ रोजी श्री.सुगरे यांनी अन्य एका अर्जाव्दारे 'रे.मु.नं.९६३/९९ या दाव्यातील शिक्षकांचे वेतन न काढणेबाबत संस्थेच्या पत्रावर, तसेच याच विषयासंबंधी लोकशाही दिनात जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या पत्रावरील कार्यवाहीची 'माहिती' मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती 'मागणी संदर्भातील निर्णय' घेऊन जाण्याविषयी कळविले. श्री.सुगरे यांचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अंतर्गत असल्यामुळे 'या अधिनियमाच्या कलम ७(ट) अन्वये (सार्वजनिक हिताशी निगडीत नसलेली व व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन करणारी माहिती) देता येणार नाही', असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. तसेच 'संस्थेच्या अधिकृत सचिवांनी सदर शाळेच्या संदर्भातील कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीस न देणेबाबत या कार्यालयाकडे लेखी सूचित केले आहे', असेही जनमाहिती अधिकाऱ्यांनी या पत्रात कळविले. असे कळविणे

'बेजबाबदारपणाचे, नियमबाह्य असंबध्द व विसंगतीच्या मजकुराचे' असल्याचे मत व्यक्त करुन श्री.सुगरे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्रीमती सुमन शिंदे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय रास्त ठरविला. मात्र 'माहितीचे स्वरुप पाहता अर्जदाराने मागणी केलेली माहिती विशेष बाब म्हणून देण्यास हरकत नाही', असा निर्णय दिला. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक, बाल विकास मंदिर यांना पत्र लिहून दि. २२.६.२००० व दि. १०.११.२००३ च्या पत्रांच्या प्रती व त्यांच्या संदर्भातील अन्य माहिती मागविली व संस्थेकडून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल, असे श्री.सुगरे यांना कळविले. त्याविरुध्द श्री.सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन माहिती अधिकाऱ्यांना दंडात्मक कारवाईतून वाचविणेकरिता नियम नसताना विशेष बाबीचा उल्लेख करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नियमाचा भंग केला आहे,' असे श्री.सुगरे यांनी आयोगापुढील अपिलात नमूद केले आहे. 'दोन पत्रांची प्रत शिक्षण विभागाकडे उपलब्ध असताना दिली नाही व मुख्याध्यापकांकडे मागितली, हा माहिती टाळण्याचाच प्रकार आहे,' असे प्रतिपादन श्री.सुगरे यांनी आयोगापढील सुनावणीत केले. संस्थेच्या सचिवांनी माहिती देऊ नका म्हणून सांगितले म्हणून माहिती नाकारणे, तसेच महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७(ट) अन्वये माहिती नाकारणे हा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य नाही. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही त्याबाबत सखोल विचार न करता तो रास्त ठरविलेला आहे. मुख्याध्यापकांकडे मागितलेल्या पत्रांची प्रत अर्जाला दोन वर्षे उलटून गेली तरीही मिळालेली नाही, त्याबाबत कोणतीही कारवाई केलेली नाही याचे कारण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी स्पष्ट करु शकले नाहीत. संबंधित माहिती सार्वजनिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असल्यामुळे ती ' विशेष बाब ' मानण्याचे कारण नाही, सर्वसाधारण बाब म्हणूनच अशी माहिती दिली गेली पाहिजे.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) द्यावयाची राहिलेली माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसात निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि.१५.१०.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

## अपील क ४१/सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) संघर्ष समितीचे पत्र क्र.जानं/९/०५ अन्वये श्री.शिवदास कदम, वेतन अधिक्षक यांच्या गैरकारभारा विरुध्द खातेकारवाई होणेबाबत दिलेला तक्रारी अर्ज.

(२) संस्थेकडील दि.६.२.२००६ चे पत्र - बडतर्फ व अनधिकृत शिक्षकांचे बेकायदेशीर निघणारे वेतन तात्काळ बंद करणेबाबत दिलेले पत्र. ३ कोटी रुपयांच्या गैरवापर प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांनी दि.२७.१२.२००५ च्या चौकशी अहवालास अनुसरुन संबंधितांविरुध्द केलेली कार्यवाही, वरील तिनही पत्रांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती व कार्यालयीन टिप्पणीची प्रत कार्यवाही केली नसल्यास कारणासह सविस्तर माहिती द्यावी.

## विवेचन

बाल विकास मंदिर, सलगरवाडी या शाळेच्या संदर्भात बडतर्फ व अनधिकृत शिक्षकांचे नियमबाह्य वेतन बंद करणेबाबत व वेतन अधिक्षक श्री.शिवदास कदम यांच्या गैरकारभाराविरुध्द खात्यांतर्गत कारवाई होण्याबाबत, तसेच ३ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणी केलेल्या कार्यवाहीविषयी संधर्ष समितीने दिलेल्या अर्जांवर/पत्रांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती श्री.सुगरे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती. मुद्दा क्र.१ व २ बाबत शिक्षण उपसंचालकांनी सुनावणी घेतली असून त्याचा अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने दि. ९.८.२००५ च्या पत्रावर काहीही कार्यवाही न करता दप्तरी दाखल केले आहे. तसेच मुद्दा क.३ बाबतचा अहवाल शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे असल्याने या कार्यालयाने कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत श्री.सुगरे यांना कळविले. त्या विरुध्द श्री.सुगरे यांनी

अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. त्यांच्यापुढील सुनावणीला श्री.सुगरे हजर न राहिल्याचे नमूद करुन व जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील निकाली काढले. या निर्णयाविरुध्द श्री.सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.सुगरे हे बाल विकास एकात्मता समाजसुधारणा मंडळात पदाधिकारी होते. संस्थांतर्गत वादातून ते विविध प्रकारचे अर्ज करीत असतात, तसेच धर्मादाय आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, लोक आयुक्त, उच्च न्यायालय आदि विविध ठिकाणी त्यांचे दावे-प्रतिदावे चालू आहेत. त्यामुळे ते सातत्याने अशा प्रकारची माहिती मागणारे अर्ज करीत असतात, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. संस्थांतर्गत वादाचा व आपल्या अन्य अर्जांचा आणि दाव्यांचा माहिती- मागणीच्या अर्जावरील अपिलाशी संबंध नाही, असे प्रतिपादन श्री.सुगरे यांनी केले. उपलब्ध माहिती आपण दिली आहे, परंतु श्री.सुगरे यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीचा अधिकार या कार्यालयाला नसल्यामुळे दिलेले उत्तर योग्य आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. अहवालाच्या अनुषंगाने सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीची प्रत आपल्याला मिळालेली नाही, असे श्री.सुगरे यांनी सांगितले. ही प्रत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीचे पत्र सुनावणीच्या आदल्या दिवशी पोस्टात टाकले गेले व सुनावणीच्या तारखेनंतर तीन दिवसांनी ते आपल्याला मिळाले, हे जाणीवपूर्वक केले गेले, असा आरोप श्री.सुगरे यांनी केला, त्याबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अपिलीय प्राधिकारी देऊ शकले नाहीत. या प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्याचे दिसते, मात्र तांत्रिकदृष्टया त्यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे.

शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व त्यांचे सहकारी यांनी संगनमताने अनियमितता, भ्रष्टाचार व गैरकारभार केला असल्याने व ते उघड होऊ नये म्हणून माहिती देणे जाणीवपूर्वक टाळून अधिकाराचा गैरवापर केल्याचे श्री.सुगरे यांनी प्रत्येक अपिलात नमूद केले आहे. त्यांच्या या आरोपांबाबतचे पुरावे हा आयोगापुढील विषय नाही, मात्र या आरोपांबाबतचा विषय प्राथमिक शिक्षण विभागाच्या संचालकांकडे प्रलंबित आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय

प्राधिकारी यांनी सांगितले व ही वस्तुस्थिती असल्याचे श्री.सुगरे यानी मान्य केले.

१९९८ पासून शिक्षण खात्यातील भ्रष्ट अधिकाऱ्यांचा ठराविक गट नियमबाहय व बेकायदेशीर कृत्ये करुन शासनाची फसवणूक व लूट करीत आहे, असा आरोप श्री.सुगरे यांनी प्रत्येक अपिलात केला आहे, तर संस्थांतर्गत वादातून व उच्च न्यायालयासह अनेक ठिकाणी विरुध्द निकाल लागलेला असतानाही श्री.सुगरे सातत्याने विविध प्रकारचे अर्ज करुन त्याच त्याच प्रकारचे आरोप व तक्रारी करीत असतात. गेल्या सहा-सात वर्षात त्यांनी अशा प्रकारचे दोनशेहून अधिक अर्ज फक्त शिक्षण विभागाकडे केलेले आहेत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित नस्ती अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यातील हवी असलेली माहिती निर्धारित शुल्क आकारुन द्यावी. कार्यालयीन टिपणीच्या प्रतीस शुल्क आकारु नये.

## अपील क्र.४५/सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) सदर शाळेतील इ.५ वी ते ७वी वर्ग विनाअनुदान तत्वावर सुरु करणेस सन १९९६ साली शासनाने मान्यता दिलेला आदेश, इ.८वीचा विनाअनुदान तत्वावर सुरु करणेस सन १९८३ साली दिलेल्या मान्यतेचा आदेश, पुढे ८ वी ते १०वी स २५% अनुदान मंजूर झालेल्या आदेशासह कार्यालयीन टिप्पणीची नक्कल, नंतर सन १९९८ पासून इ.५वी ते १०वी पर्यंत वर्गांना १००% अनुदान दिल्याच्या कार्यालयीन टिप्पणीसह नकला, सदर अनुदान मंजूर करणेकामी शिक्षण विस्तार अधिकारी यांचा रिपोर्ट त्यवरील गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या शिफारशीसह सर्व कागदपत्रांच्या नकला, अनुदान उचललेल्या बिलाच्या नकला, सदर वर्गावरील शिक्षक मान्यतेच्या कार्यालयीन टिप्पणीच्या व आदेशाच्या नकला, विनाअनुदान तत्वावरील वर्ग अनुदानावर येणेसाठी शासनाकडील नियमाच्या व परिपत्रकाच्या नकला.

## विवेचन

शरदचंद्रजी पवार विद्यालय, बावी, ता.बार्शी या शाळेच्या संदर्भातील १९९३ पासूनची विनाअनुदान तत्वावरील वर्गांच्या मान्यतेबाबतची माहिती श्री.सुगरे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असलेमुळे, जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी हे पत्र त्यांच्याकडे पाठविले. आपण मागितलेली माहिती उपशिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबधित असून ती त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे, तरीही ती ते देण्याचे टाळत आहेत, अशा कारणावरुन श्री.सुगरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा सोलापूर यांचेकडे अपील केले. निर्धारित शुल्क आकारुन माहिती घेऊन जाण्याबाबत संबंधित प्रशालेच्या मुख्याध्यापकांनी कळविल्यानंतरही श्री.सुगरे यांनी माहिती नेली नाही. रजिस्टर ए.डी. ने मुख्याध्यापकांनी माहिती पाठविली आहे. 'या कार्यालयाशी संबंधित माहितीसाठी आपण माहितीच्या अधिकारात स्वतंत्र अर्ज करावा', असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.सुगरे यांना कळविले. त्याविरुध्द श्री.सुगरे यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

प्रशालेच्या मुख्याध्यापकांनी रजिस्टर ए.डी. टपाल पाठविले होते परंतु श्री.सुगरे यांनी ते नाकारले असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. मात्र हे टपाल आपण नाकारले नसून आपण परगावी असलेमुळे ते परत गेले, असे श्री.सुगरे यांनी स्पष्ट केले. तसेच मागणी केलेली सर्व माहिती शिक्षण अधिकाऱ्यांच्या अधिकारातील असून ती त्यांच्याकडे उपलब्ध आहे, ती त्यांच्याच सहीशिक्क्यानिशी मिळाली पाहिजे, मुख्याध्यापकांकडून नको, असे आग्रही प्रतिपादन श्री.सुगरे यांनी केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या निर्णयपत्रात नमूद केल्याप्रमाणे श्री.सुगरे यांनी त्यासाठी स्वतंत्र अर्ज दिलेला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. मूळ अर्जात ही मागणी समाविष्ट असल्यामुळे असा स्वतंत्र अर्ज करण्यास सांगण्याचा निर्णय योग्य नाही व तसा स्वतंत्र अर्ज न करताच कार्यालयीन टिपण्या, विनाअनुदान तत्वावरील वर्ग/शाळा अनुदानावर येण्यासाठीचे नियम व परिपत्रक ही माहिती मूळ अर्जानुसारच

अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. मात्र मुख्याध्यापकांनी देऊ केलेली माहिती नाकारण्याची श्री.सुगरे यांची कृती योग्य नाही.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) संबधित कार्यालयीन टिपण्या, विनाअनुदान तत्वावरील वर्ग/शाळा अनुदानावर येण्यासाठीचे नियम व परिपत्रक ही माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, व जन माहिती अधिकारी/मुख्याध्यापक यांच्याकडील माहिती निर्धारित शुल्क आकारुन द्यावी.

(३) संबंधित नस्ती अपीलकर्त्यास निरीक्षणास उपलब्ध करुन द्यावी व त्यातील आवश्यक त्या प्रती निर्धारित शुल्क आकारुन द्याव्यात.

वरील क्र. २ व ३ ची पूर्तता एक आठवडयात करावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच (दि.२७.९.२००७) दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल दि.१५.१०.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

**पुणे**

**दिनांक :- ६/१०/२००७**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश बापूराव पाटील,
मु. पो. श्रीपूर (पिवळी चाळ),
ता. माळशिरस, जि. सोलापूर ... अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर ... उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश बापूराव पाटील, मु. पो. श्रीपूर (पिवळी चाळ), ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन. वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. व्ही. व्ही. जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.९.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. जून १९९९ पासून आजपर्यंत दरवर्षीच्या रोस्टरच्या सत्यप्रती
२. १९९९ पासून संस्थेतील शिक्षकांच्या शासनाने दिलेल्या नेमणूक आदेशाच्या सत्यप्रती
३. संस्थेने रोस्टरप्रमाणे नेमणूक न केल्यास यासंबंधी शासनाने काही कायदेशीर कार्यवाही केली आहे का, कार्यवाही केली असल्यास त्याचा तपशील
४. अर्जदार श्री. रमेश बापूराव पाटील यांच्या वेळोवेळी केलेल्या नेमणूकांच्या आदेशांच्या सत्य प्रती
५. प्रशालेतील इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी पर्यंत बी.ए. ला मुख्य हिंदी विषय शिक्षक व त्यांची नावे

## विवेचन

श्री. चंद्रशेखर विद्यालय प्रशाला व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, जि. सोलापूर या प्रशालेतील जून १९९९ पासून जून २००६ पर्यंतच्या रोस्टरच्या सत्य प्रती, शिक्षकांच्या शासनाने दिलेल्या नेमणूक आदेशाच्या सत्य प्रती, रोस्टरप्रमाणे नेमणुकीविषयी शासनाने कार्यवाही केली असल्यास त्याचा तपशील इत्यादी पाच मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रमेश बापूराव पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. चंद्रशेखर विद्यालय प्रशाला व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती. स्वत:संबंधीच्या नेमणुकीच्या आदेशांच्या सत्य प्रतीही त्यांनी मागितल्या होत्या. श्री. पाटील हे या प्रशालेत हिंदी विषयाचे शिक्षक होते व त्यांचे पद कमी झाले. त्यासंदर्भात त्यांनी ही माहिती मागितली होती. त्यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशनची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात चालू आहे. 'तुमच्या नेमणुकी-संबंधातील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकाराच्या तरतुदींनुसार शाळा ही 'पब्लिक ॲथॉरिटी' या संज्ञेत येत नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. बी. व्ही.जाधव यांनी दि. ६.१०.२००६ रोजी पत्रान्वये त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री. पाटील

यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांनी त्वरित माहिती देण्याचा आदेश मुख्याध्यापकांना दिला. परंतु त्यानंतरही आपल्याला मिळालेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन श्री. पाटील यांनी जन माहिती अधिकाऱ्यांवरील मुख्यतः दंडात्मक कारवाईच्या मागणीसाठी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

शाळा ही 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेत येत नाही व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, या प्रतिपादनाला श्री. पाटील यांनी आक्षेप घेतला. प्रकरण न्यायालयात असल्याचे उभय बाजूंनी मान्य केले. परंतु त्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली माहिती देण्यास बाधा येत नाही, हे आपल्याला आता स्पष्ट झाले असल्याचे मुख्याध्यापक श्री. बी. व्ही. जाधव यांनी नमूद केले. तसेच शाळा ही 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेत येत नसल्याचे उत्तर देण्याची चूक झाली. परंतु अपिलीय प्राधिकारी / शिक्षणाधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन घेतल्याने शंका दूर झाली व श्री. पाटील यांना आवश्यक ती माहिती दिली, असेही त्यांनी सांगितले. अपीलकर्त्याची त्याबाबतची पोच असणारी कागदपत्रे त्यांनी आयोगापुढील सुनावणीत सादर केली. श्री. पाटील यांनी एकच माहिती अनेकदा मागितली व वेळोवेळी ती त्यांना दिली. संस्थेच्या शाळा समितीच्या अध्यक्षांकडेही यापूर्वी त्यांनी अर्ज व अपिले केली होती, त्यामुळे माहिती नाकारलेली नाही, असे त्यांनी सांगितले. परंतु ही माहिती आपल्याला विहित मुदतीत दिली नाही, वारंवार स्मरण केल्यावर दिली, असे प्रतिपादन श्री. पाटील यांनी केले. वेळेत माहिती न दिल्यामुळे आपले पद रद्द केले गेले व आपले नुकसान झाले, असा दावा श्री. पाटील यांनी केला. परंतु जन माहिती अधिकारी श्री. व्ही. व्ही. जगताप तसेच अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी त्याचा इन्कार केला व वस्तुस्थिती लक्षात न घेता श्री. पाटील अशा स्वरुपाचे विधान करीत असल्याचे नमूद केले.

श्री. पाटील हे दि. २.८.१९९९ ते २५.७.२००७ या कालावधीत उपरोक्त प्रशालेत हिंदी विषयाचे अर्धवेळ सह-शिक्षक म्हणून कार्यरत होते. हिंदी विषयाचे पूर्णवेळ शिक्षक दि. ३१.३.२००५ रोजी निवृत्त झाल्यानंतर महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्तीनुसार सेवा ज्येष्ठतेच्या नियमान्वये आपल्याला पूर्णवेळ शिक्षक म्हणून नेमणूक मिळावयास हवी होती. त्याऐवजी अन्य व्यक्तीची

नेमणूक केली गेली, त्याला आपण हरकत घेतली. परंतु शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी त्याची दखल न घेतल्यामुळे आपण मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी असल्याचे दाखवून दि. २६.७.२००६ रोजी आपल्याला सेवेतून कमी केल्याचे कळविले, असे श्री. पाटील यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात व तोंडी नमूद केले आहे. विद्यार्थी संख्येचा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केला, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला. शिक्षक पद रद्द करण्याचा अधिकार मुख्याध्यापक व शिक्षणसंस्था यांना नाही, तसेच या संदर्भातील शिक्षणाधिकाऱ्यांचे अधिकारही मर्यादित केलेले आहेत. वर्गामधील विद्यार्थी संख्येवर सेवकसंच निश्चित केला जातो. त्यानुसार दिलेली माहिती योग्य आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), श्री. एम.एन. वीर यांनी स्पष्ट केले.

श्री. पाटील यांची मुख्य मागणी पूर्ण वेळ शिक्षकपदी नेमणूक करण्याची आहे. हा विषय उच्च न्यायालयापुढे असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांना दिली गेली आहे. तसेच वेळोवेळी त्यांनी पाठविलेल्या पत्रांना उत्तरेही देण्यात आली आहेत, असे आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व निवेदनांवरून स्पष्ट होते. हे लक्षात घेता शास्तीची मागणी स्वीकारार्ह ठरत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्यास आवश्यक वाटल्यास संबंधित नस्ती उपलब्ध करुन द्यावी व त्यातील माहिती हवी असल्यास निर्धारित शुल्क आकारून द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ६.१०.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश संदिपान कदम,
रा. घाटणे, ता. माढा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रकाश संदिपान कदम, रा. घाटणे, ता. माढा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सिध्दाराम सालीमठ

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्रीमती एस.व्ही. गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.७.२००६ |

| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.९.२००६ |
| --- | --- | --- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सरपंच व ग्रामपंचायत सदस्य घाटणे, ता. माढा, जि. सोलापूर ही पदे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयाने रद्द झालेने, त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली त्याची माहिती

## विवेचन

श्री. राजकुमार कृष्णराव पाटील, सरपंच व श्री. अशोक कृष्णराव पाटील, पंचायत समिती सदस्य, घाटणे ता. माढा या दोघा सख्ख्या भावांची पदे रद्द झाल्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. प्रकाश संदिपान कदम, रा. घाटणे ता. माढा जि. सोलापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक यांच्याकडे मागितली होती. आपल्याला चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. दिलेली माहिती योग्य असल्याचा निर्णय देऊन त्यांनी हे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. राजकुमार कृष्णराव पाटील व श्री. अशोक कृष्णराव पाटील या दोघांची अनुक्रमे सरपंच व ग्रामपंचायत सदस्य ही पदे सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली असून दोन्ही पदे रद्द झाल्याची माहिती आपल्याला मिळावी, असे श्री. कदम यांचे म्हणणे आहे. या दोघांविरुध्द श्री. कदम यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत विविध पातळ्यांवर दावा व अपिले केली. सर्वोच्च न्यायालयात आपल्या बाजूने निर्णय झाला, असे श्री. कदम यांनी लेखी नमूद केले आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती श्री. कदम यांनी मागितली होती. परंतु फक्त श्री. राजकुमार कृष्णराव पाटील यांचे पद रिक्त झाले आहे व पोट निवडणुकीने ते भरण्यात यावे असा निर्णय झाला आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विविध कागदपत्रांच्या आधारे श्री. कदम यांना स्पष्ट केले आहे. परंतु दोघांचीही पदे रद्द व्हावीत, अशी श्री. कदम यांची मूळ मागणी आहे. सर्व पातळ्यांवर झालेल्या निर्णयानुसार श्री. राजकुमार कृष्णराव पाटील यांचे सदस्यत्व रद्द होऊन या पदाची पोटनिवडणूकही आता झाली आहे, त्यामुळे हा प्रश्न

आता राहिलेला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री. सिध्दाराम सालीमठ यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

अपीलकर्त्याची मूळ मागणी ही केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तसेच दिलेली माहिती योग्य असून कार्यवाहीची प्रश्न आता राहिलेला नाही, त्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. २५.१०.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.शिवाजी हंबीरराव एकाड
रा.सरडेवाडी, ता.इंदापूर, जिल्हा पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर, जिल्हा सोलापूर

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
भिमा विकास विभाग क्र.२, जिल्हा सोलापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६९/२४५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी हंबीरराव एकाड, रा.सरडेवाडी, ता.इंदापूर, जिल्हा पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर, जिल्हा सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२ तर्फे प्रतिनिधी श्री.ए.एस.शिंदे, उपविभागीय अभियंता, भिमा पाटबंधारे उपविभाग, तुंगत, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.५.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>उपविभागीय अभियंता, भिमा पाटबंधारे उपविभाग, तुंगत, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांचेकडील आवक नोंदवहीतील आवक नं.२८९१, दि.२२.९.१९८७ रोजी इंदापूर पोस्टामार्फत आजारी असलेबाबत केलेल्या तारेची झेरॉक्स प्रत. | |

## विवेचन

भिमा पाटबंधारे उपविभाग, तुंगत, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे १९८७ साली कामावर असताना आजारी असल्याचे तारेने कळविले होते, त्या तारेची छायांकित प्रत मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी हंबीरराव एकाड यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, भिमा पाटबंधारे उपविभाग, तुंगत, ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांकनीही ही प्रत उपलब्ध करुन देता येत नसल्याचे कळविल्याच्या कारणावरुन श्री.एकाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री.एकाड हे उपरोक्त विभागात १९८७ साली रोजंदारीवर कामाला होते. त्यांनी रजा घेतली होती. विशिष्ट मुदतीत ते हजर झाले नाहीत तर त्यांना कमी करण्यात येईल, असे त्यांना कळविण्यात आले. त्यामुळे आपण आजारी असल्याचे इंदापूर पोस्टातून दि.२२.९.१९८७ रोजी तार करुन कळविले होते, असे श्री.एकाड यांचे म्हणणे आहे. या तारेच्या सत्यप्रतीची मागणी त्यांनी माहितीच्या अधिकारात केली होती. अभिलेख जतनाचा कालावधी संपल्यामुळे हे कागदपत्र नष्ट करण्यात आले आहे, त्यामुळे देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.एकाड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर, जिल्हा सोलापूर यांच्याकडे अपील केले. 'अराजपत्रित अधिकारी / कर्मचारी यांच्या रजेचे अर्ज जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा फक्त

दोन वर्षे आहे, त्याप्रमाणे कागदपत्रे नष्ट करण्यात येतात', हे पूर्वीच कळविण्यात आल्याचे स्पष्ट करुन जन माहिती अधिकाऱ्याचा निर्णय ग्राह्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हे अपील निकाली काढले.

या तारेची प्रत आपल्याला मिळावी. आपली परिस्थिती अत्यंत हलाखीची असून आपल्याला पुन्हा कामावर घेण्याच्या दृष्टीने ती मिळणे महत्वाचे आहे, असे श्री.एकाड यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. परंतु अभिलेख जतनाचा कालावधी संपूनही अनेक वर्षे उलटून गेली आहेत. त्यामुळे जवळजवळ वीस वर्षांपूर्वीच्या तारेची प्रत उपलब्ध होणे शक्य नाही, असे श्री.एकाड यांना अनेकदा स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२ तर्फे प्रतिनिधी श्री.ए.एस.शिंदे यांनी नमूद केले. ती प्रत उपलब्ध होत नसल्यास उपरोक्त कार्यालयातील आवक नोंदवहीमध्ये आवक क्र.२८९१ ही नोंद असल्याची प्रत मिळाली तरी चालेल, असे श्री.एकाड यांनी सांगितले. तेव्हाची आवक नोंदवही उपलब्ध असल्यास अपेक्षित प्रत देता येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) आवक नोंदवही उपलब्ध झाल्यास आवक नोंदवहीतील पृष्ठ क्र.२८९१, दि.२२.९.१९८७ ही नोंद असलेल्या पृष्ठाची छायांकित प्रत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन द्यावी.

**पुणे**
**दि.१०.१०.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१. श्री. सुरेश तात्याबा रसाळ
२. श्री. रामदास काशिनाथ थोरात
मु. पो. देऊळगांव रसाळ, ता.बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार बारामती, जि. पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार,बारामती
ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ३. | **उपस्थित** **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,बारामती ता. बारामती, जि. पुणे श्री. बी. जे. गोरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.३.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

तहसील कार्यालय, बारामती अंतर्गत पुरवठा शाखा, मौजे देऊळगांव रसाळ, ता. बारामती येथील अंत्योदय योजनेअंतर्गत धान्य वाटप व झालेल्या भ्रष्टाचाराबाबत माहिती

## विवेचन

अंत्योदय योजनेअंतर्गत ३४ शिधापत्रिकाधारकांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. सुरेश तात्याबा रसाळ व श्री. रामदास काशिनाथ थोरात यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती यांच्याकडे मागितली होती. मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती यांच्याकडे अपील केले. श्री. रसाळ यांना हवी असलेली माहिती देऊन अपील निकाली काढल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले. तसेच जन माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांनी 'अर्जदाराच्या माहितीच्या मागणीचा संदर्भ तपासूनच' माहिती द्यावी, असा आदेश दिला. त्यांच्या निर्णयाविरुध्द श्री. रसाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मूळ अर्जात श्री. रसाळ यांनी ३४ शिधा लाभार्थ्यांची माहिती देऊन अंत्योदय योजनेत ते केव्हापासून समाविष्ट आहेत, तसेच शासनाने त्यांना धान्यकोटा दिला आहे किंवा नाही, एवढीच माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती विहित मुदतीत दिली. आपल्याला सन २००१ सालापासूनची माहिती हवी असल्याचे श्री. रसाळ यांनी नंतर अपिलात नमूद केले, तसेच १९९८ पासून दारिद्र्य रेषेखालील ५२ लोकांना धान्य दिले गेलेले नाही. सन २००४ च्या यादीत समाविष्ट असणाऱ्या लाभार्थ्यांना दि. २८.११.२००५ पासून लाभ सुरु केलेला आहे. दरम्यानच्या काळात स्वस्त धान्य दुकानदाराने या व्यक्तींना जादा दराने गहू व तांदूळ विकला आहे. संबंधित दुकानदाराने भ्रष्टाचार केला असून त्याच्यावर अधिकारी वर्ग कारवाई करीत नाही, ती करावी व कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी श्री. रसाळ यांनी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीत केली आहे.

श्री. रसाळ यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अंत्योदय योजनेतील शिधावाटपात भ्रष्टाचार झाल्याचा त्यांचा आरोप असून त्या संदर्भात वेगवेगळया पातळ्यांवर ते अर्ज करीत

आले आहेत. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती प्रथम व द्वितीय अपिलात मागणे योग्य नाही. तसेच भ्रष्टाचार झाला असल्यास तो सिध्द करुन संबंधितांवर कारवाई करणे हा स्वतंत्र प्रशासकीय विषय आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत कारवाई करण्याचा विषय येत नाही, त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३०.१०.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र शंकर रणदिवे
मु.पो. पारगाव, ता. दौंड, जि. पुणे-४१२२०३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दौंड, जि. पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
पंचायत समिती, दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८३/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दौंड, जि. पुणे श्री. राजेंद्र हरिभाऊ कोकरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
पंचायत समिती, दौंड, जि. पुणे श्री. पोपट चिमा केदारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.५.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |

८ <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

मौजे पारगाव, ता. दौंड, येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ७१३ सिटी सर्व्हे नं. ७२ या मिळकतीस रामचंद्र शंकर रणदिवे व इतर यांनी वारसहक्काने नावे लावावीत म्हणून केलेल्या अर्जाची व दाखल केलेल्या कागदपत्राच्या नकला, अर्जाप्रमाणे नावे लावण्यास कोणी हरकत घेतली असल्यास त्याच्या नकला, नोंद करण्यास हरकत नाही, अशाबाबत ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाची प्रत

## विवेचन

मौजे पारगाव, ता. दौंड, जि.पुणे येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.७१३ (सी.टी.एस.क्र.७२) या मिळकतीला वारसहक्काने नावे लावावीत म्हणून केलेल्या अर्जाची व त्या संदर्भात हरकत, ग्रामपंचायतीचे ठराव, इतर काही कागदपत्रे असल्यास ती अशा नकला अपीलकर्ता श्री. रामचंद्र शंकर रणदिवे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारगांव, यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. रणदिवे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दौंड, यांच्याकडे अपील केले. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री. रणदिवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

उपरोक्त मिळकतीला वारसहक्काने नावे नोंदविण्याविषयीची कार्यवाही ही श्री. रणदिवे यांची मुख्य मागणी आहे. त्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली कागदपत्रे देऊ केली होती, परंतु ती त्यांनी स्वीकारली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. पोपट चिमा केदारी व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दौंड, श्री. राजेंद्र हरिभाऊ कोकरे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. त्यासाठी ग्रामपंचायतीने शिपाई पाठविला तेव्हा माहिती न घेतल्याबाबतचा पंचनामा जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केला. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांनी

आदेश दिल्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, परंतु अपीलकर्त्याने ते न स्वीकारल्याने परत आल्याचे त्यांनी आयोगापुढील सुनावणीत सादर केले. दरम्यानच्या काळात आपण गैरसमजतीतून अपील केले होते, असे श्री. रणदिवे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे व माहिती मिळाली असल्यामुळे अपील मागे घेत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ३०.१०.२००७**